# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २९६ वा रविवार दि.०५ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लातूरकरांच्या हक्काचे पाणी पळविणा-र्यांना जागा दाखवा लातूर शहरातील सभांमधून आ. निलंगेकर यांचा देशमुखांवर हल्लाबोल





लातूर/प्रतिनिधी : धनेगाव येथील मांजरा प्रकल्पामध्ये पुरेसा पाणीसाठा आहे. हे पाणी लातूरकरांसाठी आरक्षित आहे. तरीदेखील शहराला बारा दिवसांनी पाणी मिळते. प्रकल्पातून मात्र दररोज पाणी उचलले जाते. हे पाणी लातूर शहरात पोहोचण्यापूर्वीच आ. अमित देशमुख यांच्या कारखान्यासाठी वापरले जाते. लातूरकरांच्या हक्काचे पाणी कारखान्यासाठी पळविणार्यांना या निवडणूकीच्या माध्यमातून त्यांची जागा दाखवून द्या, असा हल्लाबोल लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केला.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर शहरातील रत्नापूर चौक, आझाद चौक, आदर्श कॉलनी येथे आयोजित सभांमध्ये आ. निलंगेकर बोलत होते. या सभांना खा. डॉ. अजित गोपछडे, लोकसभा प्रभारी किरण पाटील, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, विधानसभा प्रमुख गुरुनाथ मगे, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शैलेश लाहोटी, शैलेश गोजमगुंडे, लोकसभा विस्तारक सिध्देश्वर पवार, महिला शहर जिल्हाध्यक्ष रागिनीताई यादव, अजित पाटील कव्हेकर, दीपक मठपती, शैलेश स्वामी, भाग्यश्री कौळखेरे, मीना गायकवाड, उदय चवंडा, शिवसिंह शिसोदिया, मनोज सूर्यवंशी, जान्हवी सूर्यवंशी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

सभेला संबोधित करताना आ. निलंगेकर म्हणाले की, मुळात लातूरमध्ये पाणीटंचाई निर्माण होण्यासारखी परिस्थिती नाही. लातूरला पुरेल एवढे पाणी प्रकल्पात शिल्लक आहे. धरणातील पाणी लातूरमध्ये येण्यापूर्वीच देशमुखांच्या कारखान्यासाठी ते पळविले जाते असा आरोप करत निलंगा शहरात आम्ही दररोज पाणीपुरवठा करतो, अशी माहितीही आ. निलंगेकर यांनी दिली. स्व. विलासराव देशमुख यांच्या नावाने आजही मते मागितली जातात. स्व. विलासराव देशमुख यांचे कर्तृत्व निश्चितच मोठे असून ते आम्हाला ज्ञात आहे. मात्र, त्यांचा वारसा पुढे चालविणार्यांनी आपले कर्तृत्व सिध्द केले नसल्याचे आ. निलंगेकर यांनी यावेळी सांगितले. पालकमंत्री असताना देशमुखांनी लातूरसाठी काहीही केले नाही. कोविडच्या काळात ते परदेशात निघून गेले. जनतेला औषधी, इंजेक्शन व रेशन पुरवठा करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आम्हीच केले. रेल्वेने पाणी आणण्याची वेळ येणे हेच त्यांचे कर्तृत्व असून अशा व्यक्तींच्या सांगण्यावर आपण मतदान करणार का ? असा सवालही आ. निलंगेकर यांनी उपस्थित केला.

लिंगायत समाजाबद्दल या निवडणुकीत मोठी चर्चा होत आहे. देशमुख यांनी लिंगायत समाजाचा केवळ वापर केला. परंतु, समाजाच्या समस्या सोडविल्या नाहीत. तीस वर्षांपासून प्रलंबित स्मशानभूमीचा प्रश्न आम्हीच सोडविला, असे आ. निलंगेकर म्हणाले. महामार्गाच्या कामात महात्मा बसवेश्वरांचा पुतळा हलवू दिला नाही, हे समाजाने पाहिलेले आहे. जिल्हा परिषद ताब्यात आल्यानंतर लिंगायत समाजातील सामान्य व्यक्तीला आम्ही अध्यक्षपद देवून मंत्रीपदाचा दर्जा मिळवून दिला. समाजाच्या विकासासाठी जे – जे करणे शक्य आहे ते आम्ही केले. उलट काँग्रेसने लिंगायत समाजावर केवळ पुतणा मावशीचे प्रेम केल्याचेही आ. निलंगेकर यांनी यावेळी बोलताना म्हटले. आपण आता पुढच्या पिढीसाठी मतदान करणार आहोत. मागील दहा वर्षात देशात एकही दंगल झाली नाही, कुठे बॉम्बस्फोट झाला नाही. देशात शांतात व सुरक्षितता ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा त्या पदावर बसविणे आवश्यक आहे. यासाठी खा. सुधाकर शृंगारे यांना विजयी करा, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले.

## सुधाकर श्रृंगारे यांच्या विजयासाठी महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी ताकद लावा--क्रीडामंत्री संजय बनसोडे




उदगीर( प्रतिनिधी) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवुन आम्ही महायुती सरकारमध्ये सामील झालो. ' सबका साथ, सबका विकास' म्हणत राज्य सरकारने विकास केला. भाजपाकडे निस्वार्थी व त्यागी कार्यकर्ते आहेत आणि आता आम्ही संपुर्ण ताकतीने महायुतीत असुन पुन्हा केंद्रात भाजपा सरकार येईल आणि केंद्रात भाजपा सरकारची सत्ता आली तर देश महासत्ता होईल असा विश्वास क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केला. ते भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शिवसेना शिंदे गट, रिपाई आठवले गट, राष्ट्रीय समाज पार्टी, जनस्वराज्य शक्ती पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ उदगीर व जळकोट तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी यांच्या समवेत एम.आय.डी. सी. लोणी येथील आयोजीत संवाद बैठकीत बोलत होते.यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, भरत चामले, बालाजी भोसले पाटील, संग्राम हासुळे, ब्रम्हाजी केंद्रे, रामराव राठोड, अर्जुन आगलावे, ब्रम्हाजी केंद्रे, सुदर्शन पाटील,चंदन पाटील नागरगोजे, वसंत पाटील, नवनाथ गायकवाड, सय्यद जानीमियाँ, प्रकाश राठोड, गुरुनाथ बिरादार, राजकुमार बिरादार, बाळासाहेब मरलापल्ले, तुळशीराम बेंबडे, लालखाँ पठाण, अनिरुध्द गुरुडे, पप्पु पांढरे, उदयसिंह मुंडकर, नवनाथ गायकवाड, इब्राहिम देवर्जनकर, बालाजी देमगुंडे, आदी उपस्थित होते.आपल्या सर्व बुथ प्रमुखांशी चर्चा करुन लातूर लोकसभेचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांच्या विजयासाठी महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी ताकद लावावे असे आवाहन करुन महायुतीच्या सर्व पदाधिका-यांनी येत्या ६ तारखेपर्यंत आपले सर्कल व गाव सोडु नका अशा सुचना ना.बनसोडे यांनी उपस्थितांना दिल्या. भाजपाला निवडून आणण्याचा संकल्प केला.या बैठकीस उदगीर व जळकोट तालुक्यातील सरपंच, उपसरपंच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## लातूरचा पाणीप्रश्न पंतप्रधान मोदीच सोडवणार : माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण



लोहा/प्रतिनिधी : आपल्या भागातील विकासकामांत लक्ष घालणारे पंतप्रधान मोदींचे नेतृत्व आहे.आपल्या लातुरचा पाणीप्रश्न सोडवण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.तेच लातुरला कायमस्वरुपी पाणीयोजना देवू शकतात.मोदी यांच्या आश्वासनानंतर लातूर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर शृंगारे यांच्या विजयाची पायाभरणी झाली असल्याचे मत माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले. नरेंन्द्र मोदींशिवाय देशाला पर्याय नाही. नितीन गडकरी यांनी महाराष्ट्रात रस्त्यांचे मोठे जाळे तयार केले आहे.त्यामुळे लातूर लोकसभा मतदारसंघात दळण-वळणाची सोय झाली आहे.नरेंद्र मोदी तिसर्यांदा पंतप्रधान झाल्यावर लातूरला यापूढे रेल्वेने पाणी आणावे लागणार नाही,असेही ते म्हणाले.भाजप,शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस,रिपाई आठवले गट,कवाडे गट,मनसे, रासप,महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा.सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर लोकसभा मतदारसंघात विविध ठिकाणी सभांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये माळाकोळी व शिराडोण येथे आयोजित सभेत खा. चव्हाण बोलत होते.यावेळी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर,आ. अमरनाथ राजुरकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब कराळे, बालाजी गवारे,माजी जिप अध्यक्ष राहुल केंद्रे,प्रविण पाटील चिखलीकर,रोहित पाटील,वैद्यनाथ पवार, हणमंत उरगुंडे,नाना तिडके,गणपत तिडके, बाळू बाबर,रामदास पाटील,गोविंद पाटील, संगमेश्वर मिरकुटे, भारतभाऊ गिते,वारकड गुरुजी,सुधाकर सुर्यवंशी, अनंतराव पाटील, आनंदराव शिंदे,मनोहर पवार,चित्ररेखा गोरे, मुक्ताराम खंडागळे, रणजित कपाळे,बाजीराव कपाळे,प्रविण पाटील, किशनराव लोंढे,उत्तमराव वडवळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व जाती- धर्माच्या लोकांना सोबत घेवून विविध योजना आखल्या व त्याचा लाभही मिळवून दिला आहे. त्यामुळे येत्या ७ तारखेला कमळासमोरील बटन दाबून भाजपा महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर शृंगारे यांना बहुमताने विजयी करून मोदीजींचे हात बळकट करावे,असे आवाहनही चव्हाण यांनी केले. खा.प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की, पुढच्या पाच वर्षांत सिंचन, रोजगार व उद्योगधंदे यांना विशेष महत्व देऊन आम्ही काम करणार आहोत. त्यामुळे नरेंद्र मोदी यांच्यासारख्या धाडसी नेतृत्वाची आपल्या देशाला गरज आहे.भाजपा महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर शृंगारे हे सरळ स्वभावाचे आहेत. मोदीजींना तिसर्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर शृंगारे यांना मोठे मताधिक्य देण्याचे आवाहन यावेळी खा. चिखलीकर यांनी केले. याप्रसंगी शिराडोण व माळाकोळी भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरकारने खोटी आश्वासने देवून समाजाला फसवले दिलीपराव देशमुख ; धनगर समाज मेळावा उत्साही वातावरणात संपन्न



लातूर, प्रतिनिधी : भाजपने १० वर्षांपूर्वी दिलेल्या आश्वासनाने आपले जीवनमान उंचावले नाही. त्यांच्या बहुमताच्या सरकारकडून जनतेला खूप अपेक्षा होत्या पण ते अपेक्षा पूर्ण करू शकले नाहीत, याची समाजात खंत आहे. समाजातील कोणताही घटक समाधानी नाही. त्यांनी धनगर, मराठा समाजाबरोबर अन्य समाजालाही फसवले आहे, अशा सरकारला आता घरी पाठवण्याची वेळ आली आहे, असे मत माजी मंत्री, सहकारमहर्षी आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांनी व्यक्त केले.

लातूर लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने धनगर समाज मेळावा आयोजित करण्यात होता. या वेळी माजी मंत्री, सहकारमहर्षी आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब बोलत होते. लातूर ग्रामीण चे आमदार धिरज विलासराव देशमुख, मल्हार सेनेचे लहुजी शेवाळे, वक्ते डॉ. सिद्राम सलगर, उपस्थित होते.

सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख म्हणाले, गावात आणि शहरात लोकांच्या हाताला काम नाही. शेतीत परवडत नाही. सरकारने प्रत्येक घटकांच्या मागणीकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

गरजवंतांना आरक्षणाची गरज आहे. कायदा माणसांसाठी आहे. त्यामुळे समाजाची गरज लक्षात घेऊन काम करण्याची आवश्यकता आहे. पण सरकारने प्रत्येक समाजाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. काँग्रेस व इंडिया आघाडीचे नेते राहूल गांधी हे धनगर, मराठा आरक्षण सोडवण्यासाठी सकारात्मक आहेत. यासाठी केवळ जाण आणि प्रामाणिकपणा असावा लागतो, तो राहूल गांधी आणि काँग्रेस पक्ष यांच्यामध्येच आहे.

इंडिया आघाडी सरकार धनगर समाजाची आरक्षणाची मागणी धसास लावेल. आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेसने ठराव केला आहे. यातून अनेक वर्षांपासून धनगर समाजाला होत असलेला अन्याय दूर करू. समाजाची मोठी ताकद आहे. त्यांनी लोकशाही, संविधान आणि संस्कृती टिकली पाहिजे यासाठी काम करावे. डॉ. शिवाजी काळगे यांना मतदान करून विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले.

धिरज विलासराव देशमुख म्हणाले, अलिकडे महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकारणाला दृष्ट लागली. सध्याच्या सरकारने पक्ष, समाज आणि परिवारात फूट पाडून जे राजकारण सुरू केले आहे, हे लोकांना आवडलेले नाही. आपण जनतेचे प्रतिनिधी आहेत याचा सत्ताधाऱ्यांना विसर पडला आहे. ते केवळ मनाचा कारभार करतात. लोकांचे म्हणणे ऐकत माहीत. काँग्रेस जनतेच्या विकासाशी बांधिल आहे त्यामुळे काँग्रेस खोटे आश्वासन देत नाहीत. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेसने अभ्यासपूर्ण जाहिरनामा तयार केला आहे. समाजाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि प्रत्येक समाजघटकाला न्याय देण्यासाठी हा जाहीरनामा आहे.

डॉ. सिद्राम सलगर म्हणाले, आरक्षण देतो म्हणून भाजप सरकारने केवळ धनगर समाजाचीच नव्हे तर पूर्ण देशाची फसवणूक केली. रोजगार नाही, महागाई वाढली, शेती परवडत नाही याशिवाय भाजपने काही केले नाही. लहूजी शेवाळे म्हणाले, भाजप सरकार मंत्रिमंडळाच्या पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला आरक्षण देणार होते, पण समाजांची फसवणूक केली. त्यांच्या पोटात एक अन ओठात वेगळेच आहे, अशा सरकारला या निवडणुकीत धडा शिकवा.

मा. गो. मांडूरके, माधवराव कोळगावे, रामकिशन मदने, राजपाल भंडे, संभाजी सूळ, सुभाष घोडके, एकनाथ पाटील, दीपक सूळ, शेषराव हाके पाटील, भाऊसाहेब हाके, गंगाधर खराडे, सपना किसवे, चंद्रकांत धायगुडे, सिद्राम कटारे, रमेश सुरवसे, रणजित मदने, तानाजी सूर्यवंशी, उद्धव चेपट, अनुप शेळके, सचिन दाताळ, महेंद्र भादेकर, बालाजी देवकते, खंडेराव शेवाळे, पंडितराव लवटे, भागवत भातांब्रे, रोहित पाटील, गंगाधर केराळे, सुधाकर पाटील, दिनकर पडुळे, ओमप्रकाश नंदगावे, दत्ता सुरनर यांची उपस्थिती होते.

## संपादकीय....

### प्रश्न नाविक– खलाशांच्या सुरक्षिततेचा

इस्त्रायल–हमास संघर्ष भलेही पश्चिम आशियाच्या भूमीवर सुरू असेल, पण त्याची झळ संपूर्ण जगाला बसत आहे. भारतही त्यापासून सुटू शकलेला नाही. याचे कारण इराण पुरस्कृत हुती बंडखोरांकडून भारताकडे येणार्या व्यापारी जहाजांना लक्ष्य केले जात आहे. अलीकडेच इराणने 'एमएससी एरिज' हे कंटेनर जहाज जप्त केले होते. 'एमव्ही डाली' या जहाजाने बाल्टिमोर शहरातील एका पुलाला धडक मारली होती. ते जहाज गेल्या चार आठवड्यांपासून तिथेच अडकले आहे. या पार्श्वभूमीवर नाविक–खलाशांच्या सुरक्षिततेसाठी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. इराणने जप्त केलेल्या 'एमएससी एरिज' या कंटेनर जहाजावरील भारतीय महिला कॅडेट केरळमधील सुश्री ॲन टेसा जोसेफ १८ एप्रिलला भारत सरकारच्या प्रयत्नांमुळे सुखरूप भारतात परत आल्या. बाकीचे भारतीय क्रू अजूनही तिथे अडकले आहेत. सोडलेल्या खलाशांची संख्या वाढत आहे.'एमव्ही डाली' या जहाजाने बाल्टिमोर शहरातील एका पुलाला धडक मारली होती. ते जहाज गेल्या चार आठवड्यांपासून तिथेच अडकले आहे. जहाजावरील नाविकांना केव्हा बाहेर काढण्यात येईल, याविषयी काहीही सांगता येत नाही, अशी स्थिती आहे. ६ मार्च रोजी हुती क्षेपणास्त्राने बार्बाडोस–ध्वजांकित व्यापारी जहाज 'ट्रू कॉन्फिडन्स'वरील तीन क्रू सदस्य मारले गेले, तर दोघे गंभीर जखमी झाले. विविध युद्धे आणि अनेक कारणांमुळे नाविक आणि खलाशांना वेगळ्या प्रकारचा त्रास होत आहे. त्यांचे मालक त्यांना आणि त्यांच्या जहाजांना बेवारशी सोडून देत आहेत. या सोडलेल्या खलाशांची संख्या सतत वाढत असल्याने जगाने त्यांच्या दुर्दशेकडे लक्ष देणे, तपासात मदत करणे आवश्यक आहे. १८ डिसेंबर रोजी सिएरा लिओन–ध्वज असलेल्या 'ग्रँड सनी' या मालवाहू जहाजावर काम करणार्या खलाशांना कळाले की, ते चीनच्या नान्शा बंदरात अडकून पडले आहेत. जहाजाचा मालक, थाऊजंड स्टार इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीबद्दल कोणतीही माहिती नाही.इटलीच्या मेसरात अनेक नाविक तीन वर्षांपासून कॅमेरूनच्या ध्वजांकित मालवाहू जहाजावर अडकून पडले आहेत. सागरी नियमांनुसार, अगदी कठीण काळात आलेल्या जहाजमालकांनाही त्यांची जहाजे आणि कर्मचारी यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची परवानगी नाही; परंतु बरेच जण आर्थिक फायद्यासाठी दुर्लक्ष करतात. आयटीएफच्या अहवालानुसार, २०२३ वर्षी १३२ जहाजे त्यांच्या मालकांनी बेवारस सोडली होती. ती संख्या २०२२ च्या तुलनेत ११ टक्क्यांनी वाढली आहे. अनेक जहाजमालक जुन्या आणि खराब, देखभाल केलेल्या जहाजांसह वारंवार ध्वज नोंदणी बदलतात, ज्यामुळे कायदे तोडल्यानंतर त्यांना लपणे सोपे होते. यात १,४०० जहाजांचा समावेश आहे. गॅबॉन या देशाचे आपण नाव फारसे ऐकलेले नाही, ते जगातील सर्वात मोठे ध्वज राज्य कसे असू शकते? आज गॅबोनीज ध्वजाखाली जाणारी ९८ टक्के जहाजे उच्च–जोखीम मानली जातात. गॅबोनीज ध्वजाखाली जाणार्या जहाजांचे मालक शोधणे जवळजवळ अशक्य आहे.अनेक वेळा व्यापारी जहाजांना वेगवेगळ्या बंदरांत त्यांनी पैसे न भरल्यामुळे किंवा इतर आर्थिक कारणांमुळे अटक होते. अशी अटक झालेली अनेक जहाजे आज अनेक देशांच्या बंदरांमध्ये असतात. तुर्कस्तानमध्ये अंबरली बंदरामध्ये 'फत्मा युलूल' नावाचे जहाज अडकले आहे, ज्यामध्ये १२ भारतीय नाविक आहेत. ते त्या बंदरात जहाजावर ओपन तुरुंगामध्ये आहेत. अशा जहाजांचे कर्मचारी डायरेक्टर जनरल शिपिंगला पत्र लिहून, ई–मेल करून किंवा फोन कॉल करून परिस्थितीची माहिती देतात' परंतु डायरेक्ट जनरल शिपिंगकडून होणारी कार्यवाही ढिली असते. अनेक वेळा दुसर्या देशांच्या कायद्यामध्ये अडकले असल्यामुळे, नाविकांना तिथून बाहेर काढण्यासाठीकरिता शिपिंग, फॉरेन मिनिस्ट्री, कायदा मिनिस्ट्री या सर्वांच्या एकत्रित कार्यवाहीची गरज असते, जी वेगाने होत नाही.'मेरीटाईम लेबर कन्व्हेंशनल २००६'च्या कायद्याप्रमाणे नाविकांना बेवारस सोडून दिले, हे तेव्हा म्हटले जाते, जेव्हा नाविकांना त्यांचा पगार मिळत नाही किंवा परत जाण्यासाठी हवाई तिकीट मिळत नाही. असेच एक जहाज 'एम.व्ही. अरझक मोईन' हे संयुक्त अरब अमिरातीमध्ये ३ वर्षांहून जास्त काळ अडकले होते. तिथल्या नाविकांना, ज्यामध्ये १२ भारतीय होते, पगार मिळत नव्हता, खाण्यापिण्याचीही व्यवस्था नव्हती. एका मोठ्या कायद्याच्या लढाईनंतर त्यांची सुटका केली. आज जगातील १३ ते १५ टक्के व्यापारी जहाजांवर काम करणारे नाविक हे भारतीय आहेत. अनेक भारतीय नागरिक हे विविध परदेशी कंपन्या, ज्या वेगवेगळ्या देशांत नोंदणी झालेल्या आहेत, त्यांवर काम करतात; मात्र जेव्हा धोकादायक परिस्थिती निर्माण होते; जसे की, समुद्रात झालेले अपघात किंवा बंदरात झालेले अपघात, अशावेळी त्या कंपन्या आपल्या नाविकांना वाचवण्याऐवजी जहाजांना मोकाट सोडून देतात. अनेक नाविकांना पगार मिळत नाही. अनेक वेळा जेवण आणि पाण्याची कमतरता भासते.एका प्रसिद्ध झालेल्या अहवालाप्रमाणे ४०० हून जास्त भारतीय नाविकांना त्यांच्या कंपन्यांनी वार्यावर धोकादायक परिस्थितीत सोडून दिलेले आहे. त्यांना सोडवणे महत्त्वाचे आहे. अडकलेले अनेक नाविक गरिबीतून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणून समुद्रात नोकर्या शोधतात. चलाख मॅनिंग एजंट किंवा शिपिंग कंपन्या त्यांना धोकादायक जहाजांवर पाठवतात, त्यांचे वेतन रोखतात. अनेक वेळा अर्धशिक्षित नाविकांना जहाजावर पाठवले जाते. अर्धशिक्षित असल्यामुळे त्यांच्याकडून जास्त काम करवले जाते, पगार कमी दिला जातो, अनेक वेळा त्यांना बंधक बनवले जाते. म्हणून भारताबाहेर जाणार्या प्रत्येक नाविकाचे शिक्षण हे डीजी शिपिंगकडून तपासले जावे. कुठल्या एजंटच्या माध्यमातून त्यांना कामावर पाठवले जाते, त्याचेही रेकॉर्ड आपल्याकडे असण्याची गरज आहे.

# राजकारण्यांचे 'स्कँडल्स'

राजकारणातील साधनशुचिता लयाला जाऊ लागली त्याला बराच काळ लोटला. चारित्र्यवान राजकारण्यांचा शोध घेण्यासाठी आता हर्बलची दुर्बिणही कामी येणार नाही, अशी आजची स्थिती आहे. कधी बेसुमार संपत्तीच्या कारणामुळे असेल किंवा कधी गुन्हेगारी कृत्यांमुळे असेल, देशाच्या राजकारणातील नेते हे सातत्याने चर्चेत येत असतात. सध्या माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या मुलाचे व नातवाचे नाव सेक्स स्कँडलमुळे चर्चेत आले आहे. त्याचे व्हायरल व्हीडीओ आणि उपलब्ध माहिती पाहता हे राज्यातील सर्वांत मोठे सेक्स स्कँडल मानले जात आहे. यापूर्वीही काही नेत्यांची नावे अशा स्कँडल्समुळे चर्चेत आली होती. अशा प्रकरणांचा तपास नि:पक्षपातीपणाने व्हावा आणि कायद्यानुसार योग्य ती कारवाई व्हावी, ही जनतेची अपेक्षा असते.

चारित्र्य हे काचेच्या भांड्यासारखे असते, एकदा हातातून निसटले की पुन्हा पूर्ववत होत नाही, अशा आशयाचे एक सुवचन आहे. सार्वजनिक जीवनात तर व्यक्तीचे आचरण आणि चारित्र्य खूप महत्त्वाचे असते. पण अनेक राजकारणी याची दखल घेणे आवश्यक मानत नाहीत. कर्नाटकातील हसन मतदारसंघातील जनता दलाचे (धर्मनिरपेक्ष) खासदार प्रज्वल रेवण्णा हे त्याचे ज्वलंत उदाहरण ठरले आहेत.

संपूर्ण देशात लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना कर्नाटकात देशाचे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा मुलगा एच. डी. रेवण्णा आणि नातू प्रज्वल रेवण्णा यांचे नाव सेक्स स्कँडलमुळे चर्चेत आले आहे. रेवण्णा यांच्या घरात काम करणा–या मोलकरणीने आपले लैंगिक शोषण केल्याचा आरोप लावला आहे. प्रज्वलच्या पेनड्राईव्हमध्ये २९०० पेक्षा जास्त अश्लील व्हीडीओ असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे हे राज्यातील सर्वांत मोठे सेक्स स्कँडल असल्याचे तेथील महिला आयोगाने म्हटले आहे. या प्रकरणामुळे भाजपची गोची झाली असून देवेगौडांच्या पक्षाला मोठा तडाखा बसला आहे. रेवण्णा यांच्यावर सुमारे तीन हजार महिलांचे लैंगिक शोषण, धमकावणे आणि त्रास देणे असे गंभीर आरोप आहेत. त्याच्या गैरवर्तणुकीचे व्हीडीओ सार्वजनिक झाल्यावर आणि या प्रकरणाला गती मिळू लागल्यावर राज्य सरकारने त्याची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन केले. तपास पथक तयार होताच रेवण्णा देश सोडून पळून गेल्याचे स्पष्ट होत आहे. येथून ते थेट जर्मनीत गेले आणि तेथून ते कोणत्यातरी युरोपीय देशात लपले आहेत, असे सांगितले जात आहे.

या प्रकरणामुळे कर्नाटकात काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांच्या हाती आयते कोलित मिळाले आहे. विरोधी पक्षांनी केवळ भाजपच नव्हे तर पंतप्रधानांवरही निशाणा साधण्यास सुरुवात केली आहे. जेडीएसच्या कोअर कमिटीने रेवण्णा यांना पक्षातून निलंबित केले आहे. पण या प्रकरणाचा फटका लोकसभा निवडणुकीत भाजपा–जनता दल आघाडीला बसू शकतो.

निवडणुकीच्या काही दिवस आधीपासूनच हे व्हीडीओ पेनड्राईव्हमध्ये भरून लोकांमध्ये वेगाने पसरू लागले होते. पण रेवण्णाच्या घरात काम करणा–या एका मध्यमवयीन मोलकरणीने आरोप केल्यानंतर या प्रकरणावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पावले उचलण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे भाजपच्या एका नेत्याने हे व्हीडीओ वर्षभरापूर्वी त्यांच्याकडे उपलब्ध झाले होते आणि त्यांनी पक्षाच्या केंद्रीय समितीला रेवण्णांना निवडणुकीचे तिकिट दिले जाऊ नये अशी विनंती केली होती; परंतु त्याकडे लक्ष दिले गेले नाही. सुमारे वर्षभरापूर्वी याच प्रकरणात रेवण्णा यांनी स्वत: कोर्टातून स्थगिती आदेश आणल्याचीही माहिती समोर आली आहे. म्हणजेच हे प्रकरण अजिबात ताजे नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे राजकीय सत्तेच्या दबावाने हे प्रकरण दाबण्यात आले आणि रेवण्णांना पुन्हा लोकसभा निवडणुकीत उतरण्याची संधी देण्यात आली.

आता संपूर्ण प्रकरणाविषयीची माहिती समोर येऊ लागल्यानंतर कर्नाटकातील जनतेमध्ये प्रचंड असंतोष माजला आहे. याचे कारण रेवण्णा यांनी कोणत्याही वयोगटातील आणि वर्गातील



महिलांना सोडले नाही असे या व्हीडीओतून स्पष्ट होत आहे. घरगुती मदतनीस, सरकारी अधिकारी–कर्मचारी, पक्षाच्या कार्यकर्त्यांपासून सर्व प्रकारच्या महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे स्पष्ट होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ते स्वत: त्यांच्या या घृणास्पद कृत्यांचे व्हीडीओ बनवायचे, जेणेकरून त्या महिलांना धमकावून त्यांना गप्प राहण्यास भाग पाडू शकतील. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रेवण्णाच्या वासनेच्या बळी ठरलेल्यांमध्ये राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी किंवा काही कामानिमित्त भेटायला येणा–या महिला व मुलींचा समावेश आहे. या मुलींमध्ये काही जिल्हा पंचायत सदस्य, पोलिस कर्मचारी आणि इतर अनेक सरकारी विभागातील कर्मचा–यांचा समावेश आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी आहे. राजकीय नेत्यांची नावे सेक्स स्कँडल्समध्ये समोर येण्याची ही पहिलीच वेळ नाही. बाबूलाल नागर, हरियाणाचे माजी मंत्री गोपाल कांडा, मोरारजी देसाई यांच्या सरकारमध्ये संरक्षणमंत्री असणा–या जगजीवन राम यांचा मुलगा सुरेश राम, महिपाल मदेरणा आणि भंवरी देवी, एन. डी. तिवारी अशी अनेक उदाहरणे देशाने पाहिली आहेत. २०१३ मध्ये मध्य प्रदेशचे अर्थमंत्री राघवजी यांच्यावर घरातील मोलकरणीचे शोषण केल्याचा आरोप झाला होता. कायमस्वरूपी सरकारी नोकरीचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याचा आरोप सेविकेने केला. त्यावेळी राघवजी ७९ वर्षांचे होते.

या प्रकरणाची सीडी बाहेर येताच राघवजींना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. याच वर्षी जयपूरमधील एका महिलेने राजस्थानचे माजी मंत्री बाबूलाल नागर यांच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप केला. तत्पूर्वी २०१२ मध्ये काँग्रेसचे प्रवक्ते आणि राज्यसभा खासदार अभिषेक मनू सिंघवी यांच्यावर सेक्स स्कँडलचे आरोप झाले होते. भारतातील बड्या वकिलांमध्ये अभिषेक मनु सिंघवी यांचे नाव घेतले जाते; पण सिंघवी हे सर्वोच्च न्यायालयातील त्यांच्या चेंबरमध्ये आक्षेपार्ह अवस्थेत सापडले होते. सिंघवी यांचा ड्रायव्हर मुकेश कुमार लाल याच्यावर त्याची सीडी बनवून ब्लॅकमेल केल्याचा आरोप आहे. सिंघवी यांच्यावर जोरदार टीका झाल्यानंतर त्यांना काँग्रेसचे प्रवक्ते आणि कायदा व न्यायविषयक संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. हरियाणाचे माजी मंत्री गोपाल कांडा यांचेही नाव एअर होस्टेस गीतिका शर्मा यांच्या लैंगिक शोषणामुळे चर्चेत आले होते. गीतिका ही कांडा यांच्या एमएलडीआर एअरलाइन्सशी संबंधित होती आणि लैंगिक छळाची शिकार झाल्यानंतर तिने २०१२ मध्ये आत्महत्या केली होती. गीतिकाने तिच्या सुसाईड नोटमध्ये कांडावर आरोप केले होते. यानंतर कांडा यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला होता.

तथापि, ४ मार्च २०१४ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने कांडा यांची निर्दोष मुक्तता केली. २०११ मध्ये राजस्थानातील अशोक गेहलोत सरकारमधील जलसंपदा मंत्री महिपाल मदेरणा यांच्यावर झालेल्या भंवरी देवी सेक्स स्कँडलच्या आरोपांमुळे खळबळ उडाली होती. भंवरी देवी जोधपूरच्या जालीवारा गावातील एका उपकेंद्रात सहायक परिचारिका (दाई) म्हणून काम करत होत्या. सप्टेंबर २०११ मध्ये त्या बेपत्ता झाल्यानंतर त्यांचे पती अमरचंद यांनी महिपाल मदेरणा यांच्या सांगण्यावरून तिचे अपहरण केल्याचा आरोप केला होता. भंवरीसोबतची मदेरणा यांची सीडी सार्वजनिक झाल्यावर मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी मदेरणा यांची हकालपट्टी केली आणि नंतर त्यांना सीबीआयने अटक केली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री नारायण दत्त तिवारी हे एकेकाळी भारतीय राजकारणातील एक शक्तिशाली राजकारणी मानले जात होते. एन. डी. तिवारी २००९ मध्ये आंध्र प्रदेशचे राज्यपाल असताना त्याच वर्षी त्यांची कथित सेक्स सीडी वृत्तवाहिन्यांमधून समोर आली होती. यामध्ये ते तीन महिलांसोबत आक्षेपार्ह अवस्थेत दिसले होते.

# जगभरात सोनेखरेदी का वाढलीय?

जगभरात सोन्याचे भाव गेल्या काही महिन्यांमध्ये कमालीच्या वेगाने वाढताना दिसून आले आहेत. गेल्या काही वर्षांत संरक्षण साधनसामग्री खरेदी करण्याबरोबरच सोनेखरेदीकडे कल वाढत आहे. अनेक इस्लामिक देश, लॅटिन अमेरिकेतील देश, आफ्रिकन देश यांसह विकसनशील व विकसित देश सोन्याचा प्रचंड साठा करत आहेत. विशेषत: रशिया–युक्रेन युद्धानंतर हा कल अधिक वाढला आहे. आशिया खंडात सोन्याची सर्वाधिक खरेदी करणारा देश चीन आहे. गेल्या दोन वर्षांत चीनकडून होणारी सोनेखरेदी ३० टक्क्यांनी वाढली आहे. यामागे अमेरिका–चीन संघर्षाची पार्श्वभूमी आहे.गेल्या काही महिन्यांमध्ये सोन्याच्या वाढत्या भावांमुळे या चकाकत्या आणि जीवाभावाच्या धातूच्या खरेदीदारांमध्ये काहीशी चिंता दिसून येत आहे. कारण पाहता पाहता सोन्याने ७० हजारांपर्यंत मजल मारली आहे. गेल्या १० वर्षांचा आलेख पाहिल्यास सोन्याच्या किमती दुपटीपेक्षा जास्त वाढलेल्या आहेत. विशेष म्हणजे आज सार्वकालिक सर्वोच्च पातळीवर असूनही सोन्याचे भाव कमी होण्याच्या मार्गावर नाहीत. किंबहुना भविष्यात सोने अजूनच कडाडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रामुख्याने गेल्या दोन वर्षांमध्ये सोन्याच्या किमतीमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे.भारताचा विचार करता आपण प्रामुख्याने तीन गोष्टी आयात करण्यामध्ये आशिया खंडामध्ये अव्वल स्थानावर आहोत. एक म्हणजे खनिज तेल, दुसरे संरक्षण साधनसामुग्री आणि तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे सोने. आपल्याकडे सोन्याला धार्मिक महत्त्व असल्यामुळे त्याच्याकडे खरेदीचा ओघ हा वर्षानुवर्षांपासून जास्त आहे. त्यामुळे सोन्याच्या किमती प्रचंड वाढलेल्या असल्यातरी ग्राहकांचा ओढा हा फारसा कमी झालेला दिसत नाही. जागतिक स्तरावर युद्धामुळे असेल किंवा यादवी संघर्षामुळे असेल, असुरक्षितता आणि अस्थिरता निर्माण होते, त्या त्या वेळेला सोने खरेदी वाढल्याचे दिसून येते. जागतिक पातळीवर पुरवठा साखळी विस्कळीत होते त्या त्या वेळी सोन्यामधील गुंतवणूक ही वाढलेली दिसून येते. २०२० मध्ये आलेली कोरोना महामारी असो किंवा दोन वर्षांपूर्वी सुरू झालेले रशिया–युक्रेन युद्ध असो, या दोन्हींमुळे जागतिक पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली. त्याचा नकारात्मक परिणाम जागतिक अर्थव्यवस्थांवर झाला. जागतिक आर्थिक विकासाचा वेग मंदावला. औद्योगिक विकास, कृषीविकास देखील मंदावले. त्यातून सुरक्षित गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने राष्ट्रांचा सुवर्णखरेदीकडे असणारा कल देखील वाढला. हे पहिल्यांदा घडतेय असे अजिबात नाही. अनेक देश राष्ट्रीय पातळीवर सोने खरेदी करतात. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये संरक्षण सामग्रीच्या खरेदीप्रमाणे राष्ट्रांचा कल हा प्रामुख्याने सोने खरेदीकडे वाढलेला आहे. अनेक इस्लामिक देश, लॅटीन अमेरिकेतील देश, आफ्रिकन देश, विकसनशील आणि गरीब देश सोन्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करताना दिसून येत आहेत. याचा परिणाम सोन्याचे भाव वधारण्यावर झाला आहे.आशिया खंडामध्ये आजघडीला सोन्याची सगळ्यात जास्त आयात करणारा देश आहे चीन. पण गेल्या दोन वर्षांमध्ये चीनकडून सोन्याची खरेदी तब्बल ३० टक्क्यांनी वाढलेली आहे. यामागे प्रामुख्याने अमेरिका आणि चीन यांच्यातील संघर्षाचे महत्त्वाचे कारण आहे. आता हा संघर्ष केवळ संरक्षण किंवा सामग्री पातळीवर राहिलेला नसून तो आर्थिक पातळीवर येऊन थांबलेला आहे. डॉलर हा अमेरिकेच्या एकूणच सामर्थ्याचा मुख्य स्त्रोत आहे. डॉलरच्या माध्यमातून अमेरिकेने आंतरराष्ट्रीय अर्थकारणाबरोबरच राजकारणावरही दबदबा निर्माण केलेला आहे. त्यामुळे अमेरिकेच्या डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी प्रामुख्याने चीन तयारी करतो आहे. चीनने यासंदर्भात एक दीर्घकालीन आराखडा आखलेला आहे. तो साधारणत: २०५० पर्यंतचा आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये डॉलरवर आधारित जागतिक अर्थव्यवस्थेला आव्हान द्यायचे आणि ते आव्हान देताना युआनच्या माध्यमातून व्यापार वाढवायचा हे चीनचे उद्दिष्ट आहे. यामध्ये इतर देशांनाही युआनच्या माध्यमातून व्यापार करण्यासाठी चीन प्रवृत्त करत आहे.कोणत्याही चलनाचे मूल्य प्रामुख्याने त्या राष्ट्राकडे असलेल्या सोन्याच्या साठ्यावर ठरते. एखादी आपत्ती येते तेव्हा या चलनाचे अवमूल्यन होते. अवमूल्यन झाल्यामुळे विनिमयाचे खूप सारे प्रश्न निर्माण होतात. झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साधारणत २००० डॉलर प्रति औस किंवा तोळा असा सोन्याचा भाव २४०० डॉलरपर्यंत पोहोचला आहे. भारतामध्ये साधारणत: ही किंमत दोन लाख इतकी होते. खरे तर २०२२ पासून सोन्याच्या किमती या वाढत आहेत. परंतु गेल्या तीन महिन्यांत सोन्याच्या दरांनी घेतलेली उसळी चिंतेची बाब आहे. त्यामागचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे अनेक देशांच्या केंद्रीय बँका फार मोठ्या प्रमाणावर



अशा वेळी राष्ट्रांकडून आणि नागरिकांकडून सोन्यावर गुंतवणूक होते. चीनला प्रचंड मोठ्या प्रमाणावर सोन्याचा साठा करून त्या साठ्याच्या आधारावर युआनची किंमत वाढवायची आहे आणि अमेरिकेला आव्हान द्यायचे आहे. प्रत्येक वस्तूचा साठा करून ठेवणे ही चीनची रणनीती असते. कोरोना महामारीपूर्वी चीनने अनेक वैद्यकीय साधनांचा साठा करून ठेवला होता. तशाच पद्धतीने आता चीनकडून सोन्याचा संचय केला जात आहे. त्यामुळे अनेक देशांमध्ये असुरक्षितता देखील निर्माण झालेली आहे. भारताचे उदाहरण घेतल्यास गेल्या ४–५ महिन्यांत आरबीआयने देखील साधारण १४ टन सोन्याची खरेदी केली आहे. गेल्या काही वर्षांतील ही सर्वाधिक मोठी खरेदी मानली जाते. हे करण्यामागचे कारण देखील जागतिक स्तरावर निर्माण झालेली कमालीची असुरक्षितता आणि अस्थिरता हेच आहे. अशा प्रतिकूल वातावरणातील व्यवस्थापनाची रणनीती म्हणून सोन्याच्या साठवणुकीकडे पाहिले जाते. आज रशिया युक्रेन युद्ध साधारण दोन वर्षे उलटूनही संपण्याचे नाव घेत नाही. कोरोना महामारीचा परिणाम अजूनही जागतिक पातळीवर कमालीचा दिसून येत आहे. आजही पुरवठा साखळी ब–यापैकी विस्कळीत झालेली आहे.अनेक देशांच्या चलनाचे अवमूल्यन झालेले आहे. दरम्यानच्या काळातील आखातातील परिस्थिती देखील अस्थिर झालेली आहे. इस्त्रायलकडून इराणवर अद्यापही प्रतिहल्ला झालेला नाही. जग या प्रत्युत्तराची वाट बघत आहे. कारण इराणने पहिल्यांदा इस्त्रायलवर क्षेपणास्त्रहल्ले केले. त्यामुळे आखातामधली परिस्थिती स्फोटक बनली असून निश्चितपणे त्याचा सोन्याच्या किमतीवर परिणाम होणार आहे. गेल्या तीन महिन्यांत सोन्याच्या किमतीत साधारणपणे १५ टक्क्यांनी वाढ सोन्याची खरेदी करत आहेत. प्रामुख्याने रशिया आणि चीन या दोन देशांच्या केंद्रीय बँका यामध्ये अग्रेसर आहेत. पीपल्स बँक ऑफ चायना या चीनच्या सरकारी बँकेने साधारण २००० टन सोन्याची खरेदी केलेली आहे. रशियाच्या बाबतीत देखील हीच बाब दिसून येत आहे. चीनला एक महत्त्वाची भीती आहे, ती म्हणजे युक्रेन युद्धानंतर अमेरिकेने ज्याप्रमाणे रशियावर ५००० हून अधिक आर्थिक निर्बंध घातले, तशाच प्रकारे उद्या तैवानच्या एकीकरणाचा प्रयत्न झाल्यास आपल्याविरुद्धही असे निर्बंध टाकले जाऊ शकतात. त्यामुळेही चीन हा सोन्याची खरेदी वाढवतो आहे. आशिया खंडात मागच्या वर्षापर्यंत भारत हा सोन्याच्या आयातीमध्ये अव्वल स्थानी होता. परंतु आता चीनने यामध्ये बाजी मारल्याचे दिसून येत आहे. खरे तर चीन हा सोन्याचा मोठ्या प्रमाणात निर्माता देखील आहे. असे असूनही चीनने सोन्याची आयात वाढवलेली आहे. पीपल्स बँक ऑफ चायनाच्या परकीय गंगाजळीमध्ये सोन्याचा हिस्सा चीनला वाढवायचा आहे. चिनी लोकांची गुंतवणूकही प्रामुख्याने सोन्यामध्ये वाढलेली आहे. कारण चिनी लोकांना गुंतवणुकीचे पर्याय फार मर्यादित स्वरूपात आहेत. आजवर त्यांची गुंतवणूक ही प्रामुख्याने रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये होती. कारण त्यांना परदेशांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अनेक निर्बंध आहेत. चिनी नागरिक परदेशात किती रकमेपर्यंत गुंतवणूक करू शकतात यावर चीनच्या सरकारचे नियंत्रण आहे. त्यामुळे तेथील नागरिक रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये प्रामुख्याने पैसे गुंतवत असत. पण कोरोना महामारीनंतर चीनमधील बांधकाम उद्योग कोसळला आहे. याचाही परिणाम चिनी लोकांच्या सोन्याच्या गुंतवणुकीवर झालेला दिसत आहे.


# सर्व धर्मियांना एकत्र घेऊन भारत देशाचा विकास साधण्याचे काम नरेंद्र मोदीजींनी केले - माजी. शिवाजीराव पाटील कव्हेकर





लातूर दि.०४-०५-२०२४ १८ व्या लोकसभेची निवडणूक ही देशाच्या दृष्टिने खूप महत्त्वाची आहे. काँग्रेसने गेल्या ७० वर्षामध्ये सुध्दा जनतेच्या अपेक्षेची पूर्ती केलेली नाही. मात्र देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारनी मात्र कुठलाही जातीभेद न करता सर्व धर्मियांन सोबत घेऊन भारत देशाचा सर्वांगिण विकास साधण्याचे काम मोदीजींनी केले. असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.यावेळी ते हरंगुळ(खु) व एकूर्गा येथे भारतीय जनता पार्टी, शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट, रिपाई आठवले गट, रासप व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार सभेत बोलत होते.यावेळी या प्रचार सभेला भाजपा नेत्या तथा सामाजिक कार्यकर्त्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, भाजपा नेते व्यंकट पन्हाळे, भाजपा कामगार आघाडीचे नेते ज्योतीराम चिवडे, भाजपा महिला आघाडीच्या नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, चंद्रकांत खटके, मिनाक्षीताई उदारे, मेजर शिंदे, हणमंत पवार, कानिफ चव्हाण, केदार पाटील, सोमनाथ झुंजे पाटील, तानाजी झुंजे पाटील, दिलीप चिकटे, विरभद्र चिकटे, अरविंद पाटील, नागू स्वामी, ज्योतीताई भोसले आदी मान्यवर उपस्थित होते तर एकूर्गा येथील सभेला सरपंच विठाबाई काशिंदे, राजाभाऊ मुळे, बालकिशन आडसूळ, दयाराम पटाडे, लक्ष्मणराव मुळे, राजेंद्र गाडे, सचिन पुरी, दयाराम घुटे, दादासाहेब इंगळे, किशोर घुटे, शिवाजी करदुरे, राजाभाऊ वैद्य, उध्दवराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकर्यांसाठी शेतकरी सन्मान योजना लागू केली. पाच लाखांचा आरोग्य विमा, तीन कोटी महिलांना घरे, एक रूपयात पिक विमा, सर्वसामान्य नागरिक व महिलांसाठी शौचालये उभारण्याचे काम केलेले आहे. अशा एक नव्हे तर अनेक योजना राबवून सर्व सामान्य नागरिकांना आधार देण्याचे काम केले. कोरोना काळात मोदीजींनी मोफत लस देऊन लाखो नागरिकांना जीवनदान देण्याचे काम केले. त्यातच रशिया व युक्रेन युध्द, इरान इस्राईल युध्द याचा मोठा परिणाम झाल्यामुळे ५७ लाख कोटीचे नुकसान झाले. यामुळे भारताचा जीडीपी -०.२६ टक्क्यावर आलेला होता. तरीही अशा परिस्थितीत भारताने कोरोनाच्या संकटावर मात करीत सात टक्क्यावर आणण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे भारत ११ व्या क्रमांकावरून जगात पाचव्या क्रमांकावर आलेला आहे. तो भविष्यात तिसर्या क्रमांकावर राहील असा विश्वासही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला. तुमच्या माझ्यासाठी आणि आपल्या भविष्यासाठी मोदींना साथ द्यावी - अर्चनाताई पाटील चाकूरकर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या चौफेर कार्यामुळे १४ ते १९ वयोगटातील तरूण वर्ग त्यांच्याकडे आकर्षित झालेला आहे. त्यांनी केलेल्या कार्यावर प्रभावित होऊन मोदी का परिवार या उक्तीनुसार त्यांनी मोदीजींचा प्रचार सुरू केलेला आहे. तसेच मोदीजींनी महिलांसाठी शौचालये उभारून महिलांना सन्मान देण्याचे काम केले. याबरोबरच महिला बाळांतपणासाठी ५ हजार रूपये, सुकन्या योजनेच्या माध्यमातून मुलींचा जन्माला प्रोत्साहन देण्याचे काम केलेले आहे. याबरोबरच लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा निर्णय घेऊन महिलांचा सन्मान वाढविण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या विकासाला साथ देण्यासाठी व तुमच्या आमच्या भविष्यासाठी मोदीजींना साथ द्यावी. असे आवाहन भाजपा महिला आघाडीच्या नेत्या अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी केले. देशहितासाठी मोदीजींचे हात बळकट करावे - प्रतिभाताई पाटील कव्हेकर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत देशाचा चौफेर विकास करून देशामध्ये नावलौकिक वाढविण्याचे काम केलेले आहे. शेतकरी सन्मान योजना, पाच लाखांचा आरोग्य विमा, ३ कोटी महिलांना घरे, महिलांसाठी ३३ टक्के राजकीय आरक्षण अशा विविध योजना लागू करून सर्वसामान्य घटकाला न्याय देण्याचे काम केलेले आहे. याबरोबरच देशहितासाठी जे-जे शक्य आहे. त्या सर्व गोष्टी करून देशाचा जगामध्ये सन्मान वाढविण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा देशहितासाठी मोदीजींचे हात बळकट करावे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी केले.

## 'पल'च्या घड्याळाने स्नेहाचा जीव वाचला, हृदयाची इतकी धडधड वाढते कशामुळे? - त्रासाची लक्षणे व प्रकार वाचा




: दिल्लीच्या रहिवाशी स्नेहा सिन्हा यांनी पल वॉच ७ ने त्यांचे प्राण वाचवल्याचे सांगत केलेली पोस्ट सध्या सोशल मीडियावर तुफान चर्चेत आहे. पलच्या या स्मार्ट घड्याळाने स्नेहा यांना त्यांच्या हृदयाची गती प्रति मिनिट २५० बिट्सपेक्षा जास्त असल्याचा इशारा दिला होता. सुरुवातीला ही बाब लक्षातही स्नेहांना आली नव्हती, पलच्या इशाऱ्यानंतर त्या सावध झाल्या. तरीही त्यांनी दीड तास शांत होण्याचा प्रयत्न केला पण हा त्रास कमीच न झाल्याने अखेरीस त्यांनी वैद्यकीय सल्ला घेण्याचा निर्णय घेतला. आवश्यक उपचार घेतल्याने त्या आता सुरक्षित आहेत. सुरुवातीला ताण- तणावामुळे वाटत असणाऱ्या या त्रासामागे ट्रियल फायब्रिलेशन हे कारण असल्याचे समजतेय. ही स्थिती नेमकी काय, त्याची लक्षणे, प्रकार याविषयी आज आपण मायो क्लिनिकने प्रकाशित केलेली माहिती जाणून घेऊया.ट्रियल फायब्रिलेशन म्हणजे काय? ट्रियल फायब्रिलेशन (एएफआयबी) ही स्थिती हृदयाची अनियमित आणि अतिशय जलद लय दर्शवते. हृदयाच्या अनियमित लयीला एरिथमिया म्हणतात. मुळे हृदयात रक्ताच्या गुठळ्या होऊ शकतात. या स्थितीमुळे स्ट्रोक, हार्ट फेल्युअर आणि हृदयाशी संबंधित इतर गुंतागुंत होण्याचा धोका देखील असतो. ट्रियल फायब्रिलेशन या स्थितीत, हृदयाच्या वरच्या चेंबर्समध्ये, (ट्रिया) मध्ये धडधड वाढते व खालच्या हृदयाच्या चेंबर्स (वेंट्रिकल्स) पासून त्यांचे स्थान समकक्ष राहत नाही. गंभीर बाब म्हणजे अनेकदा, ची लक्षणे जाणवत नाहीत किंवा फार कमी जाणवतात. पण मुळे हृदयाची धडधड वाढणे, धाप लागणे किंवा चक्कर येणे असे त्रास होऊ शकतात.ट्रियल फायब्रिलेशन चा त्रास हा एखाद्या झटक्याप्रमाणे असतो, तो येतो, जातो, सतत राहू शकतो किंवा अचानक उफाळून येऊ शकतो. हा त्रास सहसा जीवघेणा नसतो. परंतु ही एक गंभीर वैद्यकीय स्थिती आहे ज्यामुळे स्ट्रोकसारखी जीवघेणे स्थिती उद्भवू शकते. ट्रियल फायब्रिलेशनच्या उपचारांसाठी औषधे उपलब्ध आहेत, त्याशिवाय हृदयाला योग्य पंपिंगचे प्रशिक्षण देणाऱ्या थेरपी याचा आधारही घेता येऊ शकतो.ट्रियल फायब्रिलेशनची काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे धडधडणे छातीत दुखणे चक्कर येणे थकवा गरगरणे व्यायाम करण्याची क्षमता कमी होते. धाप लागणे. अशक्तपणा.लक्षात घ्या: एट्रियल फायब्रिलेशन (एएफआयबी) असलेल्या काही लोकांना कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. ट्रियल फायब्रिलेशनचे प्रकार पहिला प्रकार म्हणजे पॅरोक्सिस्मल ट्रियल फायब्रिलेशन यामध्ये अधूनमधून ची लक्षणे येतात आणि जातात. लक्षणे सहसा काही मिनिटांपासून तासांपर्यंत टिकतात. काही लोकांना आठवडाभर लक्षणे जाणवतात. या रुग्णांना काही प्रमाणात उपचारांची गरज असते.दुसऱ्या प्रकारात अनियमित हृदयाचे ठोके सतत असतात. हृदयाची लय स्वतःच रीसेट होत नाही. लक्षणे आढळल्यास, हृदयाची लय सुधारण्यासाठी वैद्यकीय उपचार आवश्यक आहेत. दीर्घकाळ टिकणारा चा प्रकार स्थिर असतो आणि १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ टिकतो. हृदयाचे अनियमित ठोके दुरुस्त करण्यासाठी औषधे किंवा थेरपी आवश्यक आहे. या प्रकारच्या ट्रियल फायब्रिलेशनमध्ये, हृदयाची अनियमित लय रीसेट केली जाऊ शकत नाही. हृदय गती नियंत्रित करण्यासाठी आणि रक्ताच्या गुठळ्या टाळण्यासाठी औषधांची आवश्यकता असते.त्यामुळे तुम्हाला वरीलपैकी कोणतीही लक्षणे आढळून आल्यास, त्वरित वैद्यकीय मदत घ्या, दुर्लक्ष करू नका!

## कमी किंवा अतिघाम येण्याची कारणे काय?

माणसाच्या त्वचेवर घाम येणे ही एक नैसर्गिक क्रिया आहे. त्वचेखाली असणार्या स्वेदग्रंथींमधून जो द्राव तयार करुन त्वचेवर पसरवला जातो, त्याला 'स्वेद (घाम)' म्हणतात. आयुर्वेदाने स्वेद हा एक मल (त्याज्य पदार्थ) मानलेला असला तरी प्रत्येक मलाचेही स्वतःचे असे शरीर उपयोगी कार्य असते. घाम त्वचेला ओलावा पुरवून त्वचा स्निग्ध ठेवतो आणि त्वचेवरील सूक्ष्म रोमांचे धारण करतो. आयुर्वेदाने स्वेद (घाम) शरीरामधील उष्णता बाहेर फेकण्याचे कार्य करतो असे सांगितले आहे. वास्तवातही शरीराचे तापमान नियंत्रणात ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य घामाकडून होते.घाम कसा येतो? त्वचेवर स्त्रवलेल्या घामामध्ये असलेल्या पाण्याचे बाष्पीभवन होऊन थंडावा तयार केला जातो, जो त्वचेखालील रक्तवाहिन्यांमधून वाहाणार्या रक्ताला थंड करतो. शरीरभर फिरणारे हे रक्त शरीराचे तापमान वाढू देत नाही. घाम स्त्रवणाऱ्या दोन प्रकारच्या ग्रंथी असतात. एक्रिन आणि एपोक्रिन . यामधील एक्रिन प्रकारच्या ग्रंथी शरीरभर आधिक्याने असतात, ज्या त्वचेच्या पृष्ठभागावर उघडतात. एपोक्रिन प्रकारच्या स्वेद-ग्रंथी केसांच्या मुळाशी उघडतात आणि स्वाभाविकच डोके, काख, जांघ अशा ठिकाणी जिथे केस आधिक्याने असतात तिथे आधिक्याने दिसतात.नैसर्गिकपणे किती घाम सामान्य मानला जातो? निरोगी शरीरामधून साधारणपणे ७५० मिलीलीटर इतका घाम दिवसभरातून तयार केला जातो. मात्र सभोवतालचे वातावरण उष्ण असताना घामाचे प्रमाण वाढू शकते. तीव्र उन्हाळ्यात परिश्रमाचे काम करणार्या माणसाच्या शरीरामधून तासाभरातून २ ते ४ लीटर आणि दिवसभरातून १० ते १४ लीटर इतक्या प्रचंड प्रमाणातसुद्धा घाम तयार केला जाऊ शकतो, जो अर्थातच त्या कडक उन्हाळ्यात शरीराला आतून थंड ठेवण्याचे काम करतो. शरीराचे आभ्यन्तर तापमान नियंत्रणात ठेवण्यात व शरीराला थंडावा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा घाम आधुनिक जगातल्या लोकांना येणार नसेल, (ज्याचे कारण असते सभोवतालचे कृत्रिम गार वातावरण) तर अशा मंडळींच्या शरीराचे स्वास्थ्य बिघडणे स्वाभाविक असते. अखंड एसीच्या गार वातावरणात राहणार्या, शरीराचा उन्हाशी-बाह्य नैसर्गिक वातावरणाशी संपर्क येऊ न देणार्या, न चालणाऱ्या, न फिरणार्या, खेळ-व्यायाम न करणार्या अनेकांना जेव्हा घामच येत नाही तेव्हा त्यांना होणाऱ्या संभाव्य विकृतींचा विचार आपण पुढे करणार आहोतच.काही लोकांमध्ये आणि काही परिस्थितींमध्ये घाम कमी येतो, तर जाणून घेऊ घाम कमी येण्यामागील कारणे. उन्हाळ्यात जेव्हा शरीरामध्ये उष्णता वाढते तेव्हा ती उष्णता कमी करण्याचे कार्य करतो घाम.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत निलंगा येथे लातुर लोकसभा मतदार संघातील मविआचे उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न

लातुर प्रतिनिधी : दि. ३ मे २०२४ देशात लोकसभा निवडणूकीसाठी इंडीया आघाडी निवडणूक लढवीत आहे. काँग्रेस पक्षाने जनतेच्या हीताचा जाहीरनामा जाहीर केला आहे. यामध्ये शेतमालाला
चांगला भाव, मजुरांना चांगली मजुरी, स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी, जातीय जनगणना, महिला भगिनींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अर्थसहाय्य यासाठी काँग्रेस पक्षाचे नेते राहुलजी गांधी यांनी ग्यारंटी कार्ड जनतेच्या हाती दिले आहे. यासाठी आपल्या हिताचे सरकार आणण्यासाठी महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करावे असे आवाहन, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी
केले आहे. लोकसभा निवडणूक २०२४ च्या प्रचाराची रणधुमाळी आता शेवटच्या टप्प्यात अली असून तिसऱ्या टप्प्यातील होणाऱ्या लातुर मतदार संघातील प्रचारात लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.
शिवाजी काळगे यांनी आघाडी घेतल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थिती
मध्ये शुक्रवार दि. ३ मे रोजी सायंकाळी लातुर लोकसभा मतदार संघातील मविआचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या समवेत निलंगा येथील बाजार मैदान या ठिकाणी जाहिर प्रचार सभा पार पडली.
या जाहीर सभेकरीता अशोकराव पाटील निलंगेकर, निरीक्षक संतोष देशमुख, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, अभय साळुंके, लिंबन महाराज रेशमे, मोईज भाई शेख, शोभाताई बेंजरगे, संजय शेटे, अविनाश रेशमे, चक्रधर शेळके, डॉ अरविंद भातांबरे, विजयकुमार पाटील, अजित माने, अमर जाधव, सिकंदर पटेल, मकबूल वलांडीकर, हरिभाऊ गायकवाड, आबासाहेब उजेडकर, विठ्ठल पाटील, हाजी सराफ, सुधाकर पाटील, दयानंद चोपणे, लाला पटेल, ॲड.तिरुपती शिंदे, पंकज शेळके
यांच्यासह महाविकास आघाडी घटक पक्षातील पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपुत्र डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, भारताच्या सार्वत्रिक निवडणूका सुरू असून हा प्रचाराचा शेवटचा टप्पा असून या न भूतो ना भविष्यती अशी सभा आज होत आहेत, याचा अभिमान असल्याचे सांगत आज आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे आणि बंडाप्पा काळगे पितापुत्र या व्यासपीठावर उपस्थित असून शिवाचा शिवाजी झाला आणि शिवाजीचा आपणास शिवाजीराव करायचा असून निलंग्यात असलेला शिवाजीरावचा दबदबा कायम ठेवायचा आहे. यासाठी काँग्रेस पक्षाला सत्तेत आणून विद्यमान सरकार उलथून टाकण्याचे काम आपणास करायचे आहे. आजच्या ऐतिहासिक सभेमुळे निलंग्याचे काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले असून आपणास या निवडणुकीच्या रूपाने आलेली संधी दवडू नये आणि आपले भूमिपुत्र डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, यात निलंग्याच्या पाठिशी लातुर भक्कमपणे उभे आहे असे ते म्हणाले. विद्यमान सरकारने चुकीचे धोरणे राबवून शेतकरी देशोधडीला लावला मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख पुढे बोलताना ते म्हणाले की, लातुरमध्ये प्रचारासाठी पंतप्रधान, मुख्यमंत्री, दोन उप मुख्यमंत्री आले सभा घेतली पण याचा फायदा होणार नाही. देशात इंडिया आघाडीचे सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे असे म्हणत उपस्थित्यांच्या मनात एक विश्वास निर्माण केला. विद्यमान सरकारने चुकीचे धोरणे राबवून शेतकरी देशोधडीला लावला आहे आणि म्हणून शेतमालाला चांगला भाव, मजुरांना चांगली मजुरी, स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी, जातीय जनगणना, महिला भगिनींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अर्थ सहाय्य यासाठी आमचे नेते राहुलजी गांधी यांनी ग्यारंटी कार्ड आपल्या हाती दिले आहे. आज राज्यात व देशात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून हा भ्रष्टाचार मोडीत काढण्यासाठी आपल्याला पुढाकार घ्यायचा असून महायुतीचे भ्रष्टाचाराच्या पायावर उभे सरकार खाली खेचायचे असून आपल्या देशाचे संविधान बदलण्याचा यांचा विचार असून आपण संविधान रक्षन करण्यासोबत यांचे सर्व मनसुबे हाणून पाडायचे आहेत. आता आजच्या या सभेने निलंग्यातील सर्व वाघ खुले झाले असून आता डॉ. शिवाजी काळगे याना निवडून येण्यापासून कोणीही रोकू शकत नाही. डॉ शिवाजी काळगे यांचा विजय हीच आपल्या नेतृत्वाला खरी आंदराजली आहे मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आदरणीय शिवाजीराव पाटील यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली द्यायची असेल आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पावलावर पाऊल ठेवण्यासाठी, आदरणीय लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे स्वप्न साकार करण्यासाठी आणि आदरणीय सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना साथ देण्यासाठी आपण हाताच्या पंजा समोरील बटन दाबून डॉ शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे असे आवाहन उपस्थित निलंगा वासीयांना त्यांनी केले. डॉ. शिवाजी काळगे यांना आपल्या भावी पिढीसाठी निवडून द्यावे अशोकराव पाटील निलंगेकर यावेळी बोलताना अशोकराव पाटील निलंगेकर म्हणाले की, आज सभा होत असलेले हे जुने बाजार मैदान आमच्यासाठी मुंबईच्या शिवाजी पार्कप्रमाणे असून या मैदानावर आज आपण एवढ्या मोठ्या प्रमाणावर आपण जमलात ही पहिली वेळ आहे. आपली ताकद आपल्या आदरणीय नेतृत्वाच्या पाठीशी उभी केल्याने निलंगा तालुका
व लातुर जिल्ह्याचा विकास झाला. सिंचन, आरोग्य, शिक्षण, दळणवळण, सहकार याचे जाळे आपल्या नेतृत्वाखाली आजतागायत विणले गेले आहे, ज्याचा फायदा आपल्या पिढ्याना होत आहे आणि हे विरोधक म्हणतात काँग्रेस पक्षाने काय केले. आपण गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली पोकळ आणि फसवी अश्वासने व यांच्या नाकर्तेपणामुळे वाईट दिवस काढत आहोत. यातून आपल्याला बाहेर पडायचे असेल तर आपण आपल्या हक्काचा खासदार तो म्हणजे उच्च शिक्षत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना उमेदवारी दिली आहे आपण आपल्या भावी पिढीसाठी त्यांना निवडून द्यावे अशी विनंती त्यांनी केली. यावेळी बोलताना डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, मी मूळचा निलंगा नगरीचा भूमिपुत्र असून आपले प्रेम माझ्या पाठीशी आपण उभे कराल अशी अपेक्षा त्यांनी सर्वप्रथम व्यक्त केली व सर्वांचे आभार मानले. मागील १० वर्षात अनेक अश्वासने, अनेक वचणे या सरकारने दिले पण पूर्ण केली नाहीत, कडधान्य आयात केले जात आहे, चुकीची धोरणे राबवून शेतकऱ्यांना देशोधडीला लावले, सोयाबीन तेल आयात केले गेले, सुशिक्षित बेरोजगार युवकांचा नौकरीचा प्रश्न
मिटला नाही, अनेक परीक्षा घेतल्या आणि पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द केल्या गेल्या असे हे जुलमी व सर्व सामान्य माणसाचा विचार न करणारे सरकार आपल्याला बदलावे लागणार आहे. रस्ते, वीज, पिण्याचे पाणी, उद्योग,युवकांना रोजगार, महिला सुरक्षा व महिलांना स्वतःच्या पायावर उभ्या करण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यात येणार असून यासाठी इंडिया आघाडी ने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी ५ न्याय ग्यारंटीचा स्वतःच्या स्वाक्षरीने जाहीरनामा प्रकाशित केला आहे त्याची अंमलबजावणी सरकार स्थापन होताच केली जाणार आहे.यासाठी आपण आपसातील मतभेद विसरून अधिकाधिक मतदान कसे होईल याकडे लक्ष द्यावे व मला बहुमताने निवडून द्यावे अशी विनंती त्यांनी केली. यावेळी बोलताना अभय साळुंके म्हणाले की, आज निलंगा शहरात केंद्रीय मंत्री
नितीन गडकरी यांची सभा झाली ज्यासाठी पैसे देऊन माणसे जमविले यावरून स्पष्ट होते की यावेळी भाजप आणि भाजपचे रंगा-बिल्ला या निवडणुकीत क्लीन बोल्ड झाले. नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग उभारले त्यात निलंगा सुध्दा आहे पण येथील आमदाराने टक्केवारी घेऊन निकृष्ठ रस्त्याची कामे केली ज्यामुळे कितीतरी अपघात होऊन अनेक जीव हकनाक गेले असे म्हणत आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांना लक्ष केले. यानंतर बोलताना ते म्हणाले आम्ही हिंदुत्ववादी म्हणणारे विद्यमान सरकारने कधीच हिंदूचा विचार केला नाही, मराठा व धनगर आरक्षनाबाबत साधा विचार केला नाही, उच्चशिक्षण घेऊन देखील नौकरी नसल्याने आमच्या बांधवांचे विवाह होत नाहीत, महागाई कमी न करता दिवसेंदिवस वाढतच आहे याला मूठमाती द्यायची असेल तर उच्च शिक्षित उमेदवार मविआने दिला असून आजवर सर्व सामान्य माणसाचे वाटोळे करणाऱ्या यासरकारला घरी बसवायचे असून यासाठी आपल्या पाठीशी आदरणीय नेत्यांचे आशीर्वाद असून आपल्या निलंग्यातील आपला माणूस आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे निलंग्यातील मतदारांनी सर्वाधिक मताधिक्य देऊन संसदेत पाठवावे असे आवाहन केले. यावेळी बोलताना आपल्या शायरी मधून मालेगाव या ठिकाणाहून आलेल्या वाहिद अन्सारी यांनी विद्यमान सरकारचा बोगस कारभार आणि राज्यातील मविआ व देशातील इंडिया आघाडी, काँग्रेस पक्षाने देशासाठी दिलेल्या बलिदानाची त्यांच्या कार्याची, थोर महापुरुषांनी देशासाठी दिलेले योगदानाची तसेच माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि आदरणीय लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी त्यांच्या राजकिय कारकीर्दीत सर्व सामान्य माणसाच्या करीता केलेल्या कामाची माहिती उपस्थिताना दिली.यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष हमीद शेख म्हणाले की, देशाची परिस्थिती आज एवढी वाईट झाली आहे की पाहावे तिथे हिंदू मुस्लिम, मंदिर मस्जिद यावर विद्यमान सरकारचे राजकारण सुरू आहे,केंद्रीय संस्था चा वापर करून दहशत पसरविलि जात आहे, मीडिया यांच्या दावणीला बांधले गेले आहे आणि पावलो पावली घटनेचा विसर यांना पडत आहे,सत्ता असताना निलंगा नगरीचा विकास न करता केवळ टक्केवारी कडे लक्ष येथील लोकप्रतिनिधी ने केले यामुळे येणाऱ्या काळात निवडणूक होईल की नाही हे सुध्दा प्रश्नच आहे यामुळे आपण या निवडणुकीत योग्य विचार करून या सरकारला बदलण्यासाठी पुढाकार घ्यावा व सर्व सामान्य माणसाच्या हितासाठी आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे याना निवडून द्यावे असे आवाहन करीत किमान ५० हजार मतांचे मताधिक्य निलंग्यातील मतदार देतील असा शब्द दिला.

# पेरणीच्या जुगाडासाठी साठवितात माल : निसर्गाचीही अवकृपा भाव घटल्याचा शेतकऱ्यांना फटका

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) शेतकऱ्यांचे अर्थचक्र हे पूर्णतः शेतीच्या भरवशावर चालते. शेतीतून पिकवायचे आणि शेतीतच जास्तीत-जास्त खर्च करण्याचे, हे अनेक वर्षांचे तंत्र शेती उद्योगासाठी मारक ठरा चालले आहे. त्यातच दरवर्षी निसर्गाची अवकृपा व उत्पादन खर्चाच्या मानाने भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना वाईट दिवस आले आहेत. आज रोजी शेतमालाला भाव जरी मिळणार असला, तरी शेतकरी पेरणीच्या काळात शेती मशागतीस अडचण भासू नये म्हणून माल विकण्यावर भर देत असताना सर्वच भावात व्यापाऱ्यांकडून अडवणूक करून शेतमालाचे भाव पाडण्याचे तंत्र जोपासले जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रगतीला ब्रेक लागत आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतीविषयक चुकीचे धोरण राबविण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांचे अर्थकारण संकटात सापडले आहे. त्यातच निसर्गाची अवकृपा दरवर्षी होत असल्यामुळे लावलेला खर्चही शेतीतून निघत नाही, ही वस्तुस्थिती आहे. शेती मशागतीसाठी लागणाऱ्या सर्वच वस्तूंचे भाव है कितीतरी पटीत वाढले असताना मालाचे भाव तेच किंवा दरवर्षी त्यापेक्षा कमी होत असल्यामुळे शेती व्यवसाय तोट्याचा झाला आहे. पारंपरिक शेतीशी निगडीत असलेल्या शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाची कास असली, तरी दुधाचे घटत असलेले दर अजून भरीस भर नुकसानीसाठी कारणीभूत ठरत आहेत. सध्या कोणत्याच शेतमालाचे भाव स्थिर राहात नसून केंद्राचे चुकीचे आयात- निर्यात धोरण ऐन भाववाढीच्या वेळेस मालाचे दर पाडणीलाच कारणीभूत ठरत आहेत. शेतकरी शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी व शेती व्यवसायाच्या जुगाडासाठी ऐन मालविक्रीला प्राधान्य देणे गरजेचे समजून माल विकतात. नेमके त्याच वेळेस व्यापारी लॉबीकडून भाव पाडले जातात. पेरणीकाळात माल साठवून ठेवण्याची शेतकऱ्यांची मजबुरी .शेतातील माल तयार केल्यापासून तर तो मालविक्रीपर्यंत प्रत्येक वेळेस भावातील चढ-उतार हा शेतकऱ्यांना नवीन नाही. तरीही कोणत्याही मालाचे



भाव कितीही वाढले, तरी शेतकरी ऐन पेरणीच्या - वेळेस आर्थिक चणचण भासू नये म्हणून पेरणीच्या तोंडावर माल विक्रीस काढतो, ती त्यांची मजबुरी असते व त्याच काळात व्यापारी शेतकऱ्यांची मेख ओळखून भावात मंदी आणून शेतकऱ्याची दरवर्षी हेळसांड करतात. हमीभाव खरेदी योजनेकडे शेतकऱ्यांची पाठ

व्यापारी उत्पादन वाढल्यानंतर हमीभावाने शेतकऱ्यांचा माल खरेदी करीत नाही, तर उत्पादन कमी होऊन भाव वाढल्यानंतर शेतकऱ्यांकडून माल विकण्याची अपेक्षा करत असते. उत्पादन वाढल्यानंतर आयात व उत्पादन कमी झाल्यावर मालाची निर्यात, असे धोरण सरकारचे दरवर्षी राहात असल्यामुळे शेतकऱ्यांनीच या हमीभाव खरेदी केंद्राकडे पाठ फिरविल्याचे दिसन येत आहे.

# आला उन्हाळा तब्येत सांभाळा

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) सध्या लगीनसराईचे सिझन चालू असून सूर्य आग ओकत आहे. गेल्या चार पाच दिवसांपासून कडक उन्हापासून बचाव करताना लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच त्रास सहन कराव लागत आहे. उन्हापासून बचाव करून आपली तब्येत सांभाळताना शेतकरी मजूर वर्गाने अकरा च्या नंतर उन्हात काम करणे टाळावे, तहान लागली नसली तरी पुरेसे पाणी प्या, फिकट रंगाचे, सैल आणि सच्छिद्र सुती कपडे घाला, उन्हात बाहेर जाताना संरक्षक गॉगल, छत्री/ टोपी, शूज किंवा चप्पल वापरा, प्रवासात पाणी व कांदा सोबत ठेवा, मद्यपान, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड शीतपेये (कोल्ड्रिंक्स) टाळा, उच्च प्रथिनेयुक्त तसेच शिळे अन्न खाणे टाळा, पार्किंगमध्ये ठेवलेल्या वाहनांमध्ये लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना एकटे सोडू नका, अशक्त किंवा आजारी वाटत असल्यास ताबडतोब डॉक्टरांना भेटा, ओआरएस, लस्सी, तोराणी (तांदूळ पाणी), लिंबू पाणी, ताक, नारळपाणी आदी पेयांचे नियमितपणे सेवन करा असा सल्ला तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर किशन गायकवाड यांनी दिला आहे. उन्हाचा फटका बसल्यास चक्कर येणे, बेशुद्ध होणे, अचानकपणे घाम वाढणे, शरीरातील तापमान वाढणे आदी लक्षणे दिसू लागतात. उन्हापासून बचाव करण्यासाठी आपण शक्यतो उन्हात जाणे टाळावे, फारच आवश्यकता असेल तर डोक्यावर कॉटनचा पांढरा रुमाल, टोपी घालूनच घरातून बाहेर पडावे. सोबत पाण्याची बाटली सोबत ठेवावी, काम संपले की तातडीने निवारा शोधून तिथे आसरा घ्यावा, दिवसभरात टरबूज, खरबूज, मीठसाखर, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी, सरबत आदी पेय पिण्यावर भर द्यावा, सर्वात महत्वाचे म्हणजे भरपूर पाणी प्यावे, एखाद्याला उन्हाचा त्रास जाणवत असेल तर तातडीने डॉक्टरकडे न्यावे. उन्हामुळे त्वचाविकारही मोठ्या प्रमाणावर जडता. ते टाळण्यासाठी सनस्क्रीन लोशन किंवा सनकोटचा वापर केला पाहिजे. उन्हाळ्यात प्रामुख्याने उष्माघात आणि उष्मापाताचे प्रकार वाढतात. सतत कडाक्याच्या उन्हात काम केल्यानंतर उष्माघात होतो आणि त्यातून निर्माण होणारी तीव्र समस्या म्हणजे उष्माघात होय. शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. उष्माघाताला हीट स्ट्रोक किंवा सन स्ट्रोक असेही म्हणतात. रखरखत्या उन्हात बाहेर पडल्यामुळे किंवा अधिक वेळ उन्हात थांबल्यामुळे शरीरातील उष्णता संतुलनाचे कार्य विस्कळित होते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून आरोग्याची काळजी घ्यावी अशी माहिती डॉक्टरनी दिली.

# निवडणूक कालावधीत क्षेत्रीय अधिकारी यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे अधिकार प्रदान

लातूर, दि. ०४ : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने राज्य शासनाच्या गृह विभागाने ५ एप्रिल २०२४ च्या अधिसूचनेद्वारे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३च्या कलम २१ नुसार लातूर लोकसभा मतदार संघातील सर्व क्षेत्रीय अधिकारी यांची विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे अधिकार प्रदान केले आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कामासाठी सह्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर क्षेत्रीय अधिकारी (झोनल अधिकारी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १२९, १३३, १४३ व १४४ नुसार अधिकार प्रदान करण्यात आलेले विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे अधिकार ०७ मे २०२४ पर्यंत राहणार आहे.

# मतदारांसाठी मतदान केंद्रावर मिळणार किमान आवश्यक सुविधा

लातूर, दि. ०४ : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने येत्या ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ दरम्यान ४१-लातूर (अ.जा.) लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. यावेळी मतदारांना मतदान केंद्रावर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार सर्व मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, ग्लास, विविध माहिती फलक, प्रथमोपचार पेटी, आवश्यक फर्निचर यामध्ये आवश्यकतेनुसार लाकडी टेबल, प्लास्टिक खुर्च्या, आवश्यकतेनुसार प्रकाश व्यवस्था, स्वच्छता



कामगार, मतदारांना रांगेत थांबण्यासाठी सावलीची व्यवस्था, लहान मुलांची खेळणी असलेले पाळणाघर, आवश्यकतेनुसार मार्गदर्शक फलक, मतदान सहायता केंद्र या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.उष्माघातापासून बचावासाठी प्रथमोपचार सुविधा उष्णतेची लाट आणि अवकाळी पावसाची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक सुविधा मंतदान केंद्रांवर राहतील. जास्तीत जास्त मतदारांनी मतदानासाठी यावे, यासाठी मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे. यासोबतच खबरदारीचा उपाय म्हणून प्रत्येक मतदान केंद्रांवर प्रथमोपचार सुविधा राहणार आहे. यामध्ये ताप, जखम, उन्हाच्या त्रासाची लक्षणे आढळ्यास द्यावयाची प्राथमिक औषधी, ओआरएस पावडर आदी सुविधा राहणार आहे.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केली ईव्हीएम स्ट्राँग रुमची पाहणी

लातूर, दि. ०४ : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी दोन दिवस उरले असून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी मतदान यंत्र सुरक्षा कक्षाची (ईव्हीएम स्ट्राँग रूम) पाहणी केली. तसेच सुरक्षेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेत सूचनाही दिल्या.याप्रसंगी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, नायब तहसिलदार पंकज मंदाडे तसेच सुरक्षा रूमसाठी कार्यरत विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्ट्राँग रुमची पाहणी करून जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी स्ट्राँग रुमच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही व्यवस्था आणि मतमोजणी कक्षाची पाहणी केली. स्ट्राँग रूम परिसरातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा



घेतला. त्याचबरोबर मतदान झाल्यानंतर मतदान यंत्रे (ईव्हीएम) घेवून येणाऱ्या वाहनांची व्यवस्था, वाहनांचा प्रवेश व बाहेर जाण्याचा मार्ग व पार्कींगच्या व्यवस्थेची पाहणी करत संबंधितांना अनुषंगिक सूचना दिल्या. स्ट्राँग रूमचे सीसीटीव्ही चित्रण निवडणूक सामान्य निरिक्षक, निवडणूक निरिक्षक (पोलीस) तसेच उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांना पाहता यावे, यासाठी करण्यात आलेल्या बैठक व्यवस्थेचीही पाहणी यावेळी केली.पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सीसीटीव्ही यंत्रणा चोवीस तास कार्यरत रहावी, यासाठी वीजपुरवठा अखंडीत ठेवण्याच्या सूचना देत बॅकअपसाठी ईनव्हर्टरची व्यवस्थाही करण्याचे निर्देश दिले.

# लातुरात महाराष्ट्र अस्थिरोग दिवस विविध सामाजिक - आरोग्य विषयक उपक्रमांनी साजरा

लातूर : महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटनेच्या वतीने लातुरात महाराष्ट्र अस्थिरोग दिवस विविध रोग्या, सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आल्याची माहिती संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष डॉ.अशोक पोद्दार यांनी दिली. महाराष्ट्र अस्थिरोग दिवसाचे औचित्य साधून सकाळी साडे सहा ते आठ या वेळेत जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी दिशा प्रतिष्ठानच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी हाडांची ठिसूळता तपणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिशा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक अभिजित देशमुख, डॉ. नितीन सास्तूरकर, मिनीश मिणियार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी २०० हुन अधिक ज्येष्ठ नागरिकांची बीएमडी तपासणी करण्यात आली. त्यावेळी डॉ. मालपाणी, डॉ. मैंदरकर आणि इतर अनेक ज्येष्ठ डॉक्टरांचीही उपस्थिती होती. त्यानंतर ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर, डॉ. कल्याण बरमदे, ग्रीन लातूर वृक्ष टीमचे डॉ. पवन लड्डा, डॉ. वैशाली यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणानंतर पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत अस्थिरोग शिबिराचे उदघाटन सीए प्रकाश कासट यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते - पाटील, आयएमएचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. दीपक गुगळे, ऑर्थोपेडिक असो.चे सचिव डॉ. संतोष माळी , डॉ. द्वारकादास तापडिया, नंदकिशोर अग्रवाल, फुलचंद काबरा, डॉ. राहुल अकोसकर, डॉ. चेतन जाजू, डॉ. संतोष माळी , डॉ .इमरान कुरेशी, डॉ. तुषार पिंपळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या शिबिरात ६० हुन अधिक रुग्णांची तपासणी - उपचार करण्यात आले. अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. माळी ऑर्थोपेडिक क्लिनिक, अल सफा हॉस्पिटलमध्येही घेण्यात आले. सायंकाळी पाच वाजता औषधी भवन येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी ऑस्टिओपोरोसिस आणि ऑस्टियोआर्थरायटिस या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल च्या सहकार्याने घेण्यात आला. यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष पुरुषोत्तम नोगजा, जेष्ठ नागरिक संघ लातूरचे अध्यक्ष प्रकाश घादगिने , डॉ. अशोक पोद्दार, डॉ.संतोष माळी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ नागरिकांसाठी डॉ. तापडिया आणि डॉ. अकोसकर यांच्या ऑस्टिओपोरोसिस आणि ऑस्टियोआर्थरायटिस या विषयावरील मार्गदर्शनाने ज्येष्ठ नागरिक अत्यंत प्रभावित झाले. या उपक्रमाचा समारोप सोहळा रात्री नऊ वाजता पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सीपीएस मुंबईचे माजी अध्यक्ष डॉ. गिरीश मैंदारकर, आयएमए अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, डॉ. दीपक गुगळे, आयएमएचे २०२४-२५ चे प्रेसिडेंट इलेक्ट डॉ.अभय कदम, आयआरआयए चे सचिव डॉ. संदीप कवठाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी वर्ष २०२२ -२४ या कालावधीत माजी अध्यक्ष डॉ. तापडिया यांनी केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या सर्व उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी ऑर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ. संतोष माळी मी प्रेसिडेंट इलेक्ट डॉ. गिरीश कोरे, माजी अध्यक्ष डॉ. द्वारकादास तापडिया, उपाध्यक्ष डॉ. चेतन जाजू, डॉ. रणजीत हाके पाटील, सहसचिव डॉ. तुषार पिंपळे, डॉ. रोहन अकोसकर, कोषाध्यक्ष डॉ. मन्सूर भोसगे , डॉ.आशिष चलवदे, डॉ.शशिकांत कुकाले, डॉ. निलेश देशमुख, डॉ. विक्रम सूर्यवंशी, डॉ. किरण गोजमगुंडे, डॉ. श्रीनिवास संदीकर, डॉ. मधुसूदन बियाणी, डॉ. तुला उरगुंडे, डॉ. खालेद काझी, डॉ. हनुमानदास चांडक,डॉ. ऋषिकेश नळवदे, डॉ. इमरान कुरेशी, सन्घटनेचे उदगीरचे प्रतिनिधी डॉ. श्रीनिवास बलशेटवार ,डॉ. अजय महिंद्रकर, अहमदपूर प्रतिनिधी डॉ. वैभव रेड्डी, डॉ. सुनील चलवदे, निलंगा प्रतिनिधी डॉ. तात्यासाहेब देशमुख, अंबाजोगाई प्रतिनिधी डॉ. दीपक लामतुरे, डॉ. निलेश तोष्णीवाल, उमरगा प्रतिनिधी डॉ. राजकुमार कानडे, डॉ. सचिन विश्वेकर आदिंनी परिश्रम घेतले.

# पाशा पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त लोदग्यात आज शेतकरी संवाद बैठक

लातूर, ता. ४ (बातमीदार) : राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री पर्यावरण आणि शाश्वतता टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त रविवारी (ता. पाच) लोदगा (ता. औसा, जि. लातूर) येथे सायंकाळी पाच वाजता शेतकरी संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. जगासमोर आज हवामान बदल हे सर्वात मोठे आव्हान आहे. हरितगृह वायू उत्सर्जन प्रामुख्याने कार्बन सोडल्यामुळे तापमानात अभूतपूर्व वाढ झाल्याने आपले अस्तित्व धोक्यात आले आहे. युनायटेड नेशन्सचे प्रमुख 'अँटोनियो गुटेरेस' यांनी चेतावणी दिली आहे, की आपला ग्रह जागतिक होरपळीच्या युगात आहे आणि २०२३ हे मानवजातीच्या इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष म्हणून नोंदवले गेले आहे. संपूर्ण ग्रहासाठी ही एक आपत्ती आहे आणि आज मानवतेसमोरील हे सर्वात मोठे आव्हान सोडवण्यासाठी आपण सर्वांनी जागे होणे आणि लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्याकरिता वातावरणातील बदलांशी लढा देण्याचा एक भाग बनणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी केले आहे.वातावरण बदलामुळे आज युरोप आणि अरब देशामध्ये पावसामुळे हाहाकार माजवला आहे. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील औराद शाहजनी येथील तापमान राज्यात सर्वाधिक




असल्याची नोंद झाली आहे. वातावरणामध्ये कार्बनचे प्रमाण हे ४२२ पीपीएम झाले असून हेच प्रमाण ४५० पीपीएम झाल्यास मानवजात नामशेष होणार आहे. हे लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करुन वातावरणातील कार्बनचे प्रमाण करणे अति आवश्यक आहे. या करिता इतर झाडापेक्षा अधिक प्रमाणत कार्बन शोषून घेणारे बांबू हे असून त्याची मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या शेतावर लागवड करुन ज्यामुळे शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणात उतपन्न देखील घेता येवू शकणार आहे. याच अनुषंगाने पाशा पटेल यांच्या यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त फिनिक्स शैक्षणिक संकुल लोदगा (जि. लातूर) येथे शेतकरी संवाद बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या संखेने उपस्थित रहावे असे आवाहन फिनिक्स फौंडेशनचे समन्वयक परवेज पाशा पटेल यांनी केले आहे.

# उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची दुसरी तपसणी पूर्ण

लातूर, दि. ०४ : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये लातूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची दुसरी तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांच्या उपस्थितीत गुरुवारी शासकीय विश्रामगृह सभागृहात झाली.

जिल्हास्तरीय निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी आप्पासाहेब चाटे, राजेंद्र नागणे, श्री. ऐनवाड यांची उपस्थिती होती.



लातूर लोकसभा मतदारसंघातील २७ उमेदवारांनी यावेळी आपला खर्च तपासणीसाठी सादर केला. उमेदवाराच्या खर्चाचा हिशोब स्वीकारणारे पथक प्रमुख, लेखाधिकारी व सहायक लेखा अधिकारी यावेळी उपस्थित होते. सर्व उमेदवारांच्या खर्चाची आकडेवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच एका अनुपस्थित उमेदवाराला नोटीस देण्यात येणार आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE